राज्यामध्ये "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०१८/प्र.क्र.१२२/बांधकामे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ४ एप्रिल, २०१८.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेद्वारे देशाला समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या त्रयीने समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्य घटनेच्या कलम ४६ मध्ये घटनेने समाजातील दुर्बल वंचितांबाबत राज्याची जबाबदारी अत्यंत दुरदर्शीपणाने व गांभीर्याने नमूद केलेली आहे. कलम ४६ मध्ये "राज्य हे दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपुर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील." असे नमूद करण्यात आले आहे. वरील निर्देशांचे अनुषंगाने अनुसूचित जाती व सर्व प्रकारचे पीडीत शोषित असलेल्यांना सामाजिक न्याय, आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्याअनुषंगाने अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच त्याचे उद्देश साध्य व्हावेत, या करीता राज्यात "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" साजरा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यात "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" दिनांक ८ एप्रिल, २०१८ ते १४ एप्रिल, २०१८ या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय, या शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे. राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या कार्यालयांना खाली नमूद केल्याप्रमाणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत:-

दिनांक	कार्यक्रम
८ एप्रिल, २०१८	• समता सप्ताहाचे राज्यभर एकाच वेळी उद्दघाटन करावयाचे आहे. • जिल्हयातील सामाजिक न्याय विभांगातर्गत कार्यरत असलेल्या सर्व महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व जिल्हयाचे माहिती अधिकारी यांना सदर कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने सामावून घ्यावे. • या करीता जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी सर्व शासकीय अधिकारी, सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी, जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी यांना निमंत्रिक करावे.

	• स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करावे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत जमीन वाटपाचे प्रमाणपत्र वाटप करावे. • त्याचप्रमाणे विभागीय स्तरावर देखिल ठिकठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे. • इ.१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत करीयर गाईडन्स बाबत कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. • मुख्य कार्यक्रमाचे उदघाटन मा.मंत्री (सामाजिक न्याय), मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ८.४.२०१८ रोजी मुंबई येथे करण्याबाबतच्या सर्व कार्यक्रमाचे नियोजन सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई यांनी करावे.
९ एप्रिल, २०१८	• सर्व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्यातील सर्व महाविद्यालये, शाळा, निवासी शाळा, आश्रमशाळा तसेच शासकीय व अनुदानित वसतीगृहांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील लघुनाटय, प्रश्नमंजूषा,वादविवाद स्पर्धा या सप्ताहात आयोजित करण्यात याव्यात.
१० एप्रिल, २०१८	• जिल्हयाचे आरोग्य अधिकारी व सिव्हील सर्जन यांचे सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करावे तसेच आरोग्य तपासणी कार्यक्रम हाती घेणे. • समता दुतांमार्फत ग्रामस्तरावर पथनाटय लघुनाटीका इत्यादींचे कार्यक्रम करुन सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबाबत जनतेचे प्रबोधन करावे. • त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर/विभागीय स्तरावर देखिल ठिकठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे.
११ एप्रिल, २०१८	• सामाजिक न्याय विभागाअंतर्गत सर्व महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची व त्या अंतर्गत कर्जाचे वाटप लाभार्थ्यांना कशा पध्दतीने करण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती द्यावी. • आयुक्त, समाज कल्याण यांनी सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या खालील योजनांना समाजातील विविध स्तरावर व्यापक प्रसिध्दी देवून समाजाचे प्रबोधन करावे:- १. कृषि स्वावलंबन योजना २. रमाई आवास योजना(ग्रामीण व नागरी) ३. स्वआधार योजना ४. स्टॅन्ड अप इंडिया ५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामुहिक,औद्योगिक प्रोत्साहन योजना, परदेश शिष्यवृती योजना

	६. महाराष्ट्र राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळ व आयुक्त,अपंग कल्याण यांनी सर्व जिल्हयाच्या ठिकाणी अपंगांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती अपंग लाभार्थ्यांना देण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यशाळा आयोजित करावी.
१२ एप्रिल, २०१८	• सर्व शासकीय कार्यालय व स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने, जिल्हयांच्या सर्व महत्त्वाच्या ठिकाणी व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियान राबवावे. • त्याचप्रमाणे विभागीयस्तरावर देखिल ठिकठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे.
१३ एप्रिल, २०१८	• प्रत्येक जिल्हयातील सहाय्यक आयुक्त यांनी जिल्हयातील सामाजिक कार्यक्षेत्रातील विचारवंत, नामवंत पत्रकार तसेच सामाजिक चळवळीतील प्रसिध्द व्यक्ती यांचे समाज प्रबोधनपर विविध विषयावर व्याख्यानाचे आयोजन करावे. • तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नामवंत लोककलावंत यांचे विविध सामाजिक विषयावर प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करावे. • त्याचप्रमाणे विभागीयस्तरावर देखिल ठिकठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे.
१४ एप्रिल, २०१८	• दि.१४.०४.२०१८ या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हयाच्या सार्वजनिक ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास मानवंदनेचा शासकीय कार्यक्रम आयोजित करुन समता सप्ताहाची सांगता कार्यक्रमाचे उद्दघाटन करावे. सदर मानवंदना कार्यक्रमासाठी त्या ठिकाणी पोलिस बँडचा कार्यक्रम आयोजित करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना द्यावी याबाबतची सर्व जबाबदारी जिल्हयाचे सहायक आयुक्त यांची राहिल. • जिल्हास्तरावरील सर्व कार्यालयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करावे व जिल्हयाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली प्रमुख कार्यक्रमाचे आयोजन करुन "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" यांची सांगता करावी.

२. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी सप्ताहाच्या सुरुवातीलाच सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचे एक लहान बुकलेट तयार करुन ते आपल्या अधिनस्त असलेल्या प्रादेशिक उपायुक्त व सहायक आयुक्त यांच्यामार्फत दि.०८.०४.२०१८ ते दि.१४.०४.२०१८ या दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमाच्या वेळी जनतेस मोफत उपलब्ध करुन द्यावे.

३. शासनाने व्यसनमुक्तीसाठी ज्या स्वयंसेवी संस्था व व्यक्तींना पुरस्कार प्रदान केलेले आहे अशा सर्व संस्था/व्यक्तींमार्फत जिल्हानिहाय व्यसनमुक्तीचे कार्यकम दि.०८.०४.२०१८ ते दि.१३.०४.२०१८ दरम्यान घेण्यात यावेत.

४. दि.१०.०४.२०१८ ते दि.१३.०४.२०१८ या दरम्यान सर्व जिल्हा तसेच तालुका पोलिस यंत्रणांनी अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा १९८९ बाबत समाजामध्ये प्रबोधनपर जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करुन सदर कायद्याची माहिती जनसामान्यांना देण्याच्या दृष्टीने आपआपल्या स्तरावर कार्यशाळा आयोजित कराव्यात.

५. समता प्रतिष्ठान,नागपूर व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांनी सप्ताहाच्या सुरुवातीलाच म्हणजेच दि.०८.०४.२०१८ पासून मोठया महानगरातील एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन, मुख्य चौक व वर्दळीचे ठिकाणे अशा जागांवर सामाजिक न्याय विभागांच्या विविध योजना तसेच जातपडताळणी व समता प्रतिष्ठान व बार्टी मार्फत राबविल्या जाणारे प्रशिक्षण कार्यक्रम यांची मोठया होर्डींगव्दारे जाहिरात करावी. तसेच नगरपालिका, नगरपंचायत व तालुका येथेही पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समता प्रतिष्ठान, नागपूर यांनी जिल्हयाच्या ठिकाणी संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना रु.२.०० लक्ष व प्रादेशिक स्तरावरील संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना रु.३.०० लक्ष निधी तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.

७. सदर कार्यक्रमाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी त्या त्या जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांची राहील व कार्यक्रमाची काटेकोर अंलबजावणी करण्यासाठी पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांची राहील.

८. "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" साजरा करताना ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगर पालिका वा राज्य निवडणूक आयोगाने घोषित/लागू केलेल्या अन्य कोणत्याही निवडणूक/पोटनिवडणूकीची आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४०४१७३४२५१८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.04.04 17:37:32 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
५) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) सर्व विभागीय आयुक्त,महसुली विभाग
७) आयुक्त,समाजकल्याण,पुणे
८) सर्व जिल्हाधिकारी
९) महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र,पुणे
१०) महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनाय,मंत्रालय,मुंबई
११) व्यवस्थापकीय संचालक,महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित,मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
१३) व्यवस्थापकीय संचालक,संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित,मुंबई
१४) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित,मुंबई
१५) सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग
१६) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण
१७) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१८) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
१९) निवासी लेखा परिक्षक,मुंबई/अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१) सर्व सह/उपसचिव,अवर सचिव,कक्ष अधिकारी,सा.न्या.व वि.स.विभाग,मंत्रालय,मुंबई
२२) निवडनस्ती/बांधकामे.